# सोडत पध्दतीने सदनिका वाटप करणेची कार्यपध्दती खालील प्रमाणे

| अ.क्र. | टप्पा क्रमांक | सोडतीची प्रक्रीया |
|---|---|---|
| 1. | पहिल्या टप्प्यात करण्यात येणारी कार्यवाही | स.नं.३३५ .प्लॉट क्र.फा ,अ/१५७ ,घोरपडेपुणे ,पेठ , या योजनेतील ७२ निवासी पात्र झोपडीधारकांना सोडत पध्दतीने सदनिकांचे वाटप करण्यात येणार असून सदर ७२ निवासी पात्र झोपडीधारकांपैकी झोपुप्राचे कार्यालयीन परिपत्रक क्र. २३५ नुसार कुटुंबातील अंध, दिव्यांग (अपंग) झोपडीधारक किंवा विधवा महिला कुटुंबप्रमुख असल्यास त्यांना त्यांचे योग्य शासकीय पुरावे तपासुन प्रथम प्राधान्याने खालील मजल्यावरील सदनिका देण्यात येतात.<br>योजनेतील ७२ निवासी पात्र लाभार्थ्यांपैकी जे लाभार्थी अंध, दिव्यांग (अपंगत्व किमान ४०%)विधवा महिला असलेबाबतच्या प्राप्त होणाऱ्या शासकिय पुराव्याची पडताळणी ससून रुग्णालयामार्फत/ अधिकृत वेबसाईटवर ऑनलाइन तपासणी करुन त्यामध्ये योग्य असणाऱ्या पुराव्याप्रमाणे अंध, दिव्यांग ( अपंगत्व किमान ४०%), विधवा महिला यांची यादी सर्वांच्या माहितीकरीता अथवा आक्षेपाकरिता योजनाक्षेत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येईल. |
| 2. | दुसऱ्या टप्प्यात करण्यात येणारी कार्यवाही | प्रत्यक्ष सोडतीच्या वेळी सर्व प्रथम अंध, दिव्यांग (अपंगत्व किमान ४०%) तसेच विधवा पात्र लाभार्थ्यांचे जेवढे शासकिय प्रमाणपत्रासह अर्ज प्राप्त होतील त्या संख्येएवढे उपलब्धतेनुसार पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावरील सदनिका सोडत पध्दतीने निश्चित करण्यात येतील. या करीता पात्र ठरलेल्या अंध, दिव्यांग(अपंग) व विधवा लाभार्थ्यांच्या यादीतील नावांच्या चिठ्ठया तयार करण्यात येतील. या यादितील पात्र संख्ये ऐवढया पहिल्या, दुसऱ्या वा तिसऱ्या मजल्यावरील सदनिकांची संख्या निश्चित करण्यात येईल. त्यानंतर अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधाराकांच्या नावांच्या चिठ्ठ्या घडी करुन सर्वांसमक्ष काचेच्या/ प्लास्टिकच्या पारदर्शक बरणीमध्ये टाकण्यात येतील. प्रत्यक्ष सोडत काढताना उपलब्ध असलेल्या सदनिका त्यांचे मजला व मजल्यावरील सदनिका क्रमांक या क्रमाने पारदर्शक बरणीमधील अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारकांच्या चिठ्ठयांमधून सोडत काढण्यात येईल. उदा., पहिल्या मजल्यावरील १०१ क्रमांकाच्या सदनिकेसाठी सोडतीकरीता उपस्थित असलेल्या झोपुप्रा कार्यालयाचे अधिकारी यांच्या हस्ते |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

| | | |
|---|---|---|
| | | झोपडीधारक लाभार्थ्यांच्या नावाची चिठ्ठी उपस्थित प्रतिनिधींच्या समोर बरणीतुन काढून, चिठ्ठीतील नाव असलेल्या झोपडपट्टीधारक लाभार्थ्यासाठी १०१ क्रमांकाची सदनिका निश्चित करण्यात येईल व ती सदनिका चिठ्ठी निघालेल्या अश्या अंध,दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारकास नियमानुसार वाटप झाल्याचे समजण्यात येईल. त्यानंतर पहिल्या मजल्यावरील उपलब्ध सदनिका क्रमांक १०२,१०३,१०४,१०५, १०८,१०९,११० अश्या पध्दतीने पहिल्या मजल्यावरील सदनिका संपुनही अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारकांच्या चिठ्ठया शिल्लक राहिल्यास दुसरा वा तिसऱ्या मजल्यावरील सदनिकांचे अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारक यांना वाटप पुर्ण करण्यात येईल. अश्या प्रकारे अनुक्रमे चिठ्ठया निघालेल्या अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारकांना सदनिका नियमानुसार वाटप झाल्याचे समजण्यात येईल. |
| 3. | तिसऱ्या (अंतिम) टप्प्यात करण्यात येणारी कार्यवाही | अंध, दिव्यांग (अपंग) झोपडीधारक किंवा विधवा महिला कुटुंबप्रमुख यांना प्राधान्याने वाटप केल्यानंतर १४ सदनिका झोपुप्राच्याकडे शिल्लक ठेवण्यात. त्यानंतर शिल्लक राहिलेले झोपडपट्टीधारक लाभार्थी यांच्या नावाच्या चिठ्ठया तयार करुन सर्वांसमक्ष घडया करुन त्या चिठ्ठया एका पारदर्शक बरणीत टाकण्यात येतील. त्यासाठी अंध, दिव्यांग (अपंग), विधवा लाभार्थी यांना वाटप करुन शिल्लक राहिलेले मजले व सदनिका व त्यानंतर झोपुप्राकरीता शिल्लक ठेवलेल्या १४ सदनिका झालेल्या क्रमांकापासून उर्वरित लाभार्थ्यांकरीता सोडत सुरु करण्यात येईल. त्यानुसार अनुक्रमे मजल्याचे व सदनिकेच्या क्रमानुसार उपलब्ध सदनिकेकरीता झोपुप्राचे अधिकारी यांचे हस्ते झोपडपट्टीधारक लाभार्थ्यांच्या नावाची चिठ्ठी उपस्थित प्रतिनिधीच्या समोर बरणीतुन काढून, चिठ्ठीत नाव असलेल्या झोपडपट्टीधारक लाभार्थ्यासाठी ती सदनिका निश्चित करण्यात येईल व ती सदनिका चिठ्ठी निघालेल्या अश्या झोपडीधारकास नियमानुसार वाटप झाल्याचे समजण्यात येईल. उदा., अंध, दिव्यांग (अपंग) व विधवा झोपडीधारकांच्या सदनिकांचे पहिल्या मजल्यावरील एकूण ८ सदनिका त्यांचे क्रमांक १०१,१०२,१०३,१०४,१०५, १०८,१०९,११० यांचे झालेले वाटप तसेच दुसऱ्या मजल्यावरील पुढील १० सदनिका अनुक्रमे २०१,२०२,२०३.... २१० अश्या क्रमांकाच्या सदनिका अंध, अपंग व विधवा यांना यापुर्वीच सोडतीत वाटप झाल्या |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

| | | |
|---|---|---|
| | | असल्यास त्या पुढील १४ सदनिका झोपुप्राच्या ताब्यात घेण्यात येतील जेणेकरुन सदर १४ सदनिकांची निगराणी राखणे सोईस्कर होईल. त्यानंतर त्यापुढील मजल्यावरील उर्वरित राहिलेल्या शिल्लक सदनिका उर्वरित पात्र निवासी झोपडीधारकांकरीता सोडतीने वाटप करण्यात येईल. व सदर सोडत सोडतीकरीता उपस्थित असलेल्या झोपुप्राचे अधिकारी यांच्या हस्ते झोपडपट्टीधारक लाभार्थ्यांच्या नावाची चिठ्ठी उपस्थित असलेल्या झोपडपट्टीधारक प्रतिनिधीसमोर काढण्यात येईल. याच पध्दतीने तिसऱ्या मजल्यावरील उर्वरित सदनिका व त्यानंतर चौथ्या ते नवव्या मजल्यावरील उर्वरित सर्व सदनिकांचे अनुक्रमे वाटप पात्र झोपडपट्टीधारक लाभार्थ्यांच्या नावाच्या चिठ्ठया झोपुप्राच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते काढून निश्चित करण्यात येईल. अश्या प्रकारे सर्व पात्र झोपडीधारकांना सदर योजनेमध्ये बांधण्यात आलेल्या इमारतीतील सर्व नऊ मजल्यांपर्यंत ८६ पैकी ७२ सदनिकांची सोडत काढण्यात येईल व सोडतीत नाव निघालेल्या अश्या झोपडीधारकांना त्या-त्या सदनिका नियमानुसार वाटप झाल्याचे समजण्यात येईल. हि सर्व सोडत प्रक्रिया पात्र झोपडपट्टीधारकांचे प्रतिनिधी यांचे उपस्थितीत करण्यात येईल. या संपुर्ण सोडत प्रक्रियेचे व्हिडीओ रेकॉर्डींग करण्यात येईल. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी झोपुप्रा पुणे यांचे मान्यतेनंतर सोडतीची अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल. सोडत प्रक्रियेचे संपुर्ण व्हिडीओ रेकॉर्डींग झोपुप्राच्या अधिकृत वेबसाईट www.srapune.gov.in यावर पाहण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येईल. |

दि. ३०/०९/२०२१

तहसिलदार (ताबा)
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण